REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २८ जून, १९४४ अंक २६

धी
## बॉम्बे को-ऑपरेटिव
## इन्शुअरन्स सोसायटी लि.

| | | |
|---|---|---|
| नवीन काम ( १९४३ ) | रु. | ३९,२७,६१९ |
| एकंदर चालू विमे | रु. | १,६१,९०,५४१ |
| जीवन विमा निधि | रु. | २२,१५,९७४ |
| कुल उत्पन्न | रु. | १०,३३,००० |

अध्यक्ष : शेठ माधवलाल मकनजी भट्ट, जे. पी.
मॅनेजर : श्री. जी. एच. ठाकोर, एम्. ए. ( कॅंटब. )

महाराष्ट्र–कर्नाटकचे चीफ ऑर्गनाइझर्स :
**श्री. कुळकर्णी आणि कं.**
मुख्य कचेरी :
**को–ऑपरेटिव इन्शुअरन्स बिल्डिंग,**
सर फिरोजशाह मेहता रोड, कोट, मुंबई.

**हिंदुस्थानची आघाडीवरील सहकारी संस्था**

## दि बॅंक ऑफ महाराष्ट्र लि.
### पुणें शहर

भांडवल :
( ता. ३१–५–४४ रोजीं )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत व खपलेलें | : | रु. १०,००,००० |
| वसूल झालेलें | : | रु. ५,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | : | रु. १,०८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | : | रु. ७५,००,००० चे वर |

—: डायरेक्टर्स :—
श्री. धों. कृ. साठे, चेअरमन,
श्री. वा. पु. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार,
श्री. श्री. गो. मराठे, श्री. त्रिं. वि. रानडे, श्री. र. घि. सोहनी,
श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा. रा. जोशी,
श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख

: शाखा :
पुणें ४, दलाल स्ट्रीट, मुंबई, जळगांव, नागपूर.
बॅंकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

## पुना गेस्ट हाउस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone
779




TELEGRAM
Guest House
Poona 2.

## विजापूर जिल्हा दुष्काळ सहाय्यक समिती, पुणें.

विजापूर जिल्ह्यांत दुष्काळ कामीं पुण्यांत स्थापन झालेल्या समितीनें एकूण ६१,००० रुपयांवर मदत केली. पैकीं ठोकळ २८,००० रु. चें कापड आणि ३२,००० रुपयांवर अन्नखर्च झाला. तीन तालुक्यांत समितीनें ४ अन्नछत्रें चालविलीं होतीं. खुद्द विजापूर शहर, तिकोटा आणि कोल्हाळ या तीन गांवीं समितीतर्फे मध्यमवर्गीय कुटुंबांना 'डोल' देण्यांत येई. दुष्काळअखेर अन्नछत्रांत १,७९,४४५ व डोल ७९,१९७ मिळून एकूण ४॥ लाख जेवणें देण्यांत आलीं. अशा तऱ्हेची माहिती विजापूर जिल्हा दुष्काळ सहाय्यक समितीच्या अखेरच्या सर्वसाधारण सभेंत सांगण्यांत आली. ही सभा गुरुवार ता. २२ जून १९४४ रोजीं 'श्रीमुकुन्द भवन' रविवार पेठ येथें समितीचे अध्यक्ष राजा मुकुंदलाल बन्सिलाल यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती.

समितीच्या कामाचा अहवालवाचन झाल्यानंतर जमाखर्चांत शिल्लक उरलेली रक्कम रु. ५,००० पुणें येथील डॉ. रामकृष्ण हरि भडकमकर यांच्या अध्यक्षतेखालीं पुणें अन्न समितीनें सुरू केलेल्या लहान मुलांसाठीं दूधकेंद्रास मदत म्हणून देण्याचा ठराव पास झाला व समितीचें कार्य संपल्यामुळें ती समाप्त केल्याचा ठराव पास होऊन सभा आटोपली. समितीचा छापील सविस्तर अहवाल देणगीदार, वृत्तपत्रें, व इतर सहाय्यकांकडे लौकरच पाठविण्यांत येईल.

---

### प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटच्या शाळा व परीक्षा

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटनें पुणें, धारवाड व अहमदाबाद येथें प्रत्येकीं एक प्रमाणें तीन सहकारी शाळा स्थापन केल्या आहेत. कोऑपरेटिव्ह सर्टिफिकेट परीक्षा (ज्युनियर) व कोऑपरेटिव्ह डिप्लोमा परीक्षा (सीनियर) अशा दोन परीक्षांसाठी विद्यार्थी शाळेंत शिकवून तयार केले जातील. शिक्षणाचें माध्यम तीन शाळांत अनुक्रमें मराठी, कानडी व गुजराती असें राहील. ज्युनिअर कोर्सची फी २० रुपये व सीनियर कोर्सची फी ३० रुपये आहे. अर्जाबरोबर ५ रुपये डिपॉझिट म्हणून पाठवले पाहिजेत, ते पुढें फीमध्यें वळते करून घेतले जातील. बाकीची रकम शाळा सुरू झाल्यापासून एका महिन्यांत भरली पाहिजे. डिपॉझिटची रकम कोणत्याही कारणास्तव परत मिळणार नाहीं. व्हर्नॅक्युलर फायनल किंवा इंग्रजी तिसरी इयत्ता पास झालेल्यास सर्टिफिकेट परीक्षेच्या कोर्सला प्रवेश मिळूं शकेल. मॅट्रिक अथवा एस. एल. सी. परीक्षा पास झालेल्यांस डिप्लोमा कोर्सला प्रवेश मिळेल. दोनहि कोर्स शाळेच्या एका टर्ममध्यें पुरे केले जातील. पहिली टर्म जुलैचा तिसरा सोमवार ते ऑक्टोबरचा शेवटचा शनिवार अशी राहील. नोव्हेंबरचा शेवटचा सोमवार ते मार्चचा तिसरा शनिवार अशी दुसरी टर्म राहील. पाठांच्या एकूण दिवसांपैकीं तीन चतुर्थांश तरी दिवस विद्यार्थी हजर पाहिजे. दरवर्षी ऑक्टोबरमध्यें व मार्चमध्यें, अशी दोनदां परीक्षा घेतली जाईल. रहाण्याची व जेवणाची व्यवस्था विद्यार्थ्यांनीं आपली स्वतःची केली पाहिजे. अभ्यासक्रमाची माहिती मागाहून प्रसिद्ध होईल.

## विविध माहिती

### सोन्याच्या निर्गतीसंबंधीं खटला

२ फेब्रुवारी, १९४४ रोजीं मुंबईच्या कस्टम्स प्रिव्हेंटिव्ह अधिकाऱ्यांनीं एका आगबोटीची तपासणी केली, तेव्हां त्या बोटीवर फिटरचें काम करणाऱ्या यानचिन ह्या नांवाच्या चिनी माणसाजवळ ३,८०० रुपये किंमतीचे ७६ सॉव्हरिन आढळले. त्याला अटक करण्यांत येऊन त्याचेवर डिफेन्स ऑफ इंडिया (९० ब) नियमाखालीं रिझर्व्ह बँकेच्या परवान्याविना सोनें निर्गत करण्याचा गुन्हा केल्याबद्दल खटला भरण्यांत आला. ह्या नियमानें मध्यवर्ती सरकारनें सी कस्टम्स ॲक्टाचीं बंधनें सोन्याच्या आयाती–निर्गतीवर लादलीं. हीं बंधनें अत्यंत व्यापक स्वरूपाचीं असल्यानें हीं कायदेशीरपणें घालतां येत नाहींत, ह्या मुद्यावर मुंबईच्या प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनें यानचिनला निर्दोषी ठरविलें. रिझर्व्ह बँकेकडून आवश्यक तो परवाना आरोपीनें आणलेला नव्हता, ही गोष्ट फिर्यादी पक्षानें सिद्ध करणें जरूर असतांना, फिर्यादी तसें करूं शकला नाहीं, ह्यामुळें खटल्यांत त्यास यश येणें शक्य नाहीं, असेंहि मॅजिस्ट्रेट म्हणाले.

### बॉल बेअरिंगजची निर्गत

स्वीडन जर्मनीकडील आपली बॉल बेअरिंगजची निर्गत ५० टक्के कमी करणार आहे व त्याप्रमाणें अमेरिकेशीं करार झाला आहे, असें वृत्त प्रसिद्ध झालें आहे.

### कामगारांना नुकसानभरपाई

मजुरांना झालेल्या मृत्युबद्दल व दुखापतीबद्दल वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ॲक्टाप्रमाणें नुकसानभरपाई देण्यांत येतें. १९४२ सालीं एकूण ४२,६०२ प्रकरणांत १८,१९,५०५ रुपये नुकसान भरपाईदाखल देण्यांत आलें, असें ताज्या अहवालावरून दिसून येतें. एकूण अपघातांपैकीं ९२३ प्राणघातक ठरले, अपघातांमुळें २,१८७ मजूर कायमचे जायबंदी झाले व ३९,४९३ कांहीं काळापुरते घरीं बसले.


**JUST PUBLISHED**

**INDIAN RURAL PROBLEM**

BY

Sir Manilal Nanavati and Prof. J. J. Anjaria.

(Issued by the Indian Society of Agricultural Economics, Bombay).

Price Rs. 8

(Postage extra).

*Sole Selling Agents:—*

THE CO-OPERATORS' BOOK DEPOT.

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २०२ | तंबाखू ह्यांचेऐवजीं इतर पिकें—दुष्काळाच्या कारणांची चौकशी—जर्मनीचा कोंडमारा. | |
| २ शेतीच्या अभिवृद्धींत सहकाराचें स्थान ... | २०३ | ७ मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळ ... ... | २०६ |
| ३ गेल्या वर्षीचा पावसाळा | २०४ | ८ कागदावर नियंत्रण ... | २०७ |
| ४ सेक्रेटरींचा शिक्षणवर्ग | २०४ | ९ सहकारी सेल सो. ची परिषद ... ... | २०८ |
| ५ बेळगांव जिल्ह्यांत रेशमाचा धंदा ... ... | २०४ | | |
| ६ स्फुट विचार .. ... | २०५ | | |
| धान्याचीं पिकें—कपास व | | | |



# अर्थ

बुधवार, ता. २८ जून, १९४४


## शेतीच्या अभिवृद्धींत सहकाराचें स्थान

हिंदुस्थानांतील बहुसंख्य लोकांची आर्थिक स्थिति सुधारावयाची म्हणजे शेतकरी वर्गाच्या रहाणींत प्रथम सुधारणा झाली पाहिजे ही गोष्ट आतां सर्वमान्य झाली आहे. शेतीच्या धंद्यांत गुंतलेले लोक ह्या देशांत बहुसंख्य आहेत, एवढेंच नव्हे तर हा धंदा हिंदी राष्ट्राच्या जीवनाचा आत्मा आहे. हिंदी जनतेच्या अन्नाचा उगम धान्यांच्या पिकांमध्यें आहे आणि त्यांचा पुरवठा वाढवण्यास शेतीचा धंदा अधिक उत्पादक व किफायतशीर होणें आवश्यक आहे. स्वदेशी उद्योगधंदे, कारखाने व व्यापार ह्यांची अभिवृद्धी बहुसंख्य शेतकरीवर्गाच्या प्राप्तीवर व माल विकत घेण्याच्या सामर्थ्यावर अवलंबून रहाणार आहे. त्याचप्रमाणें कारखान्यांस लागणारा पुष्कळसा कच्चा माल शेतीपासूनच मिळतो आणि त्याचाहि पुरवठा पुरेसा होणें आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें अगत्याचें आहे. ह्या कारणांमुळें युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेच्या सर्व योजनांमध्यें शेतीच्या सुधारणेस आणि शेतकरीवर्गाच्या सुस्थितीस अग्रस्थान दिलेलें आढळून येईल. हिंदुस्थान सरकारच्या विषमानें आर्थिक अभिवृद्धीच्या ज्या योजना तयार होत आहेत, त्यांमध्यें हिंदी शेतीच्या प्रगतीच्या योजनेचा अंतर्भाव झाला आहे. ह्या योजनेच्या सामान्य स्वरूपाची स्थूलमानाची कल्पना सर फिरोज खारेघाट, मध्यवर्ती सरकारच्या शिक्षण खात्याचे जादा चिटनवीस, ह्यांनीं वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींस नुकतीच दिली. इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चनें नेमलेल्या एका उपसमितीनें प्रस्तुत शेती योजना तयार केली असून तिचे सर फिरोज अध्यक्ष होते, हें येथें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

आर्थिक अभिवृद्धीच्या इतर आणि मोठ्या योजना युद्धोत्तर काळांत अमलांत येण्यासाठीं आहेत. हिंदुस्थान सरकारची शेती योजना तात्काळ चालू व्हावयाची आहे. येत्या दहा वर्षांत हिंदी शेतीचें उत्पादन पन्नास टक्यांनीं आणि पुढील पांच वर्षांत शंभर टक्यांनीं वाढवावयाचें हा तिचा उद्देश आहे. तिचा भांडवली खर्च एक हजार कोटि रुपये आणि वार्षिक चालू खर्च वीस कोटि रुपये होईल अशी तरतूद आहे. शक्य तितकी जमीन पिकांखालीं येईल तेव्हां दर एकरी प्रतिवर्षी नऊ आणे ह्याप्रमाणें सुधारणेचा खर्च येईल असा हा अंदाज आहे. टाटा-बिर्ला योजनेंत पंधरा वर्षांत १२४५ कोटि रुपयांच्या खर्चाची व्यवस्था असून तिच्या योगानें शेतीचें उत्पादन १३० टक्यांनीं वाढावयाचें आहे हें तुलनात्मक दृष्टीनें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. योजनेंतील खर्चाचे आंकडे युद्धापूर्वीच्या बाजारभावांवर आधारलेले आहेत; त्यांचे चालू किंमतींत परिवर्तन केलें असतां तिचा एकूण खर्च दोन हजार कोटि रुपयांवर जाईल.

प्रत्येक हिंदी व्यक्तीस पुरेसें व चांगलें अन्न खाण्यास मिळावें आणि जनतेची रहाणी सुधारावी हा आपल्या योजनेचा मुख्य उद्देश असल्याचें सर फिरोज ह्यांनीं सांगितलें. अर्थातच ती तपशीलवार तयार केलेली नाहीं; प्रांतिक सरकारांनीं आक्रमावयाच्या मार्गाचें तिच्यामध्यें दिग्दर्शन आहे असें ते म्हणाले. हिंदुस्थान सरकार योजनेच्या अंमलबजावणींत द्रव्य सहाय देणार असून वार्षिक वीस कोटि रुपयांपैकीं त्याचा हिस्सा अडीच कोटि रुपये असेल. "अधिक धान्य पिकवण्याच्या" मोहिमेसाठीं मध्यवर्ती सरकार ग्रँटस देत आहे. त्यांचा उपयोग प्रांतिक सरकारांनीं तुटीच्या भागांस धान्याचा पुरवठा होण्याच्या दृष्टीनें करावयाचा आहे. शेतीच्या धंद्याचें तंत्र शिकलेलीं माणसें तयार करण्याचें काम प्रथम हातीं घेण्यांत येणार आहे. पाण्याचा पुरवठा, खतें, बियाणें, जमीनीचे बांध, जनावरांची निगा इत्यादि बाबींची सुधारणा, इत्यादि बाबी हातीं घेण्यांत येतील. त्यांचे संबंधांत कोणत्या गोष्टी केल्या जातील ह्याची त्रोटक माहिती सर फिरोज ह्यांनीं आपल्या मुलाखतींत दिली आहे.

"शेतीच्या मालाची विक्री सहकारी पद्धतीनें होईल अशी तजवीज प्रत्येक खेड्यामध्यें करण्यांत यावी" अशी एक सूचना त्यांच्या योजनेंत आहे. ह्यावरून मुंबई प्रांतांत सहकारी तत्वावर शेतमालाच्या विक्रीची व्यवस्था मोठ्या प्रमाणावर करण्याचें काम हातीं घेण्याचें महत्व किती आहे हें ध्यानांत येईल. प्रत्येक खेड्यांत एक माहितगार मार्गदर्शक नेमण्यांत यावा अशीहि सूचना योजनेमध्यें आहे. ह्याचा उपयोग सहकारी संस्थांचा कारभार नीट रीतीनें चालवण्यास खेडेगावी लोकांस सहाय मिळण्याकडे होईल. हिंदुस्थान सरकारच्या योजनेची यशस्विता प्रांतिक सरकारांच्या कार्यक्षमतेवर आणि उत्साहावर अवलंबून रहाणार आहे हें उघड आहे. तरी मुंबई सरकारनें प्रांतिक सहकारी संघटनाच्या आवश्यक असलेल्या विस्ताराची रूपरेखा तात्काळ आखून मध्यवर्ती सरकाराच्या योजनेस अनुसरून त्वरित कार्यास लागलें पाहिजे. सहकारी अभिवृद्धीची योजना आखण्यासाठीं मुंबई सरकारानें एक समिती नेमली होती, तिची योजना तयार झालेली आहे असें समजतें. हिंदुस्थान सरकारच्या शेतीच्या प्रगतीविषयींच्या व्यावहारिक कल्पनांचें स्वरूप पहातां आमच्या सरकारानें सहकारी पुनर्घटनेची आपली योजना व्यापक व मूलग्राही करण्याचें महत्व किती आहे हें दिसून येईल.

शेतीच्या तंत्राची सुधारणा हा त्या धंद्याच्या अभिवृद्धीचा पाया आहे. तथापि, ह्या सुधारणेस संघटन आणि पैसा ह्यांची मदत आवश्यक आहे आणि हें सहाय देण्याचें सामर्थ्य सहकारी तत्वांत आणि कार्यपद्धतींत आहे. शेती खातें, सहकारी खातें, सहकारी संस्था व कार्यकर्ते आणि महसूल खातें ह्यांच्या सह-

विचारानें शेतीच्या अभिवृद्धीच्या योजना आखणें व पार पाडणें अगत्याचें आहे. आपल्या पद्धतीनें स्वतःच्या सहकारी संघटनेच्या विस्ताराच्या योजना तयार करण्याची सहकारी खात्याची व कार्यकर्त्यांची जबाबदारी ह्यामुळें कमी होत नसून वाढत आहे. शेतीच्या संवर्धनाचा आराखडा तयार आहे. सहकाराच्या विस्ताराच्या गरजा त्यामध्यें योग्य रीतीनें आतां बसवल्या पाहिजेत. ह्या बाबतींत अल्पसंतुष्टपणा व दिरंगाई कामाची नाहींत. आपल्या कल्पना व व्यावहारिक सूचना सहकारी संस्था व कार्यकर्ते ह्यांनीं सहकारी खात्यापुढें मांडून त्याच्या मार्फत त्यांचा योग्य परामर्श प्रांतिक सरकाराकडून घेतला जाईल ह्याविषयीं प्रयत्न केला पाहिजे.

### गेल्या वर्षाचा पावसाळा

पुणें येथील सिमला ऑफिसांतील असिस्टंट मीटिऑरॉलॅजिस्ट, श्री. पी. एस हरिहरन, ह्यांनीं १९४३ च्या मानसून पावसाचा आढावा काढून तो "इंडियन फार्मिंग"मध्यें प्रसिद्ध केला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें १९४३ चा पावसाळा हा समाधानकारक मानला पाहिजे. जुलैच्या तिसऱ्या आठवड्यांत बंगालच्या बरद्वान जिल्ह्यांत आलेले पूर, जुलैच्या शेवटच्या आठवड्यामधील अजमीर-मारवाडमधील महापूर व बनारसजवळील सप्टेंबरमधील अतिवृष्टी हीं गेल्या वर्षीच्या पावसाळ्याचीं वैशिष्ट्यें समजतां येतील. छोटा नागपूर व ओरिसा येथें नेहमींपेक्षा अनुक्रमें २२% व २१% पाऊस जास्त पडला, तर सिंध व मद्रास येथें तो ५२% व ३६% कमी पडला.

पश्चिम किनाऱ्यावर मानसून पाऊस २९ मे रोजीं अवतीर्ण झाला. बंगालच्या उपसागरांत तो ११ मे रोजीं आला. सबंद हिंदुस्थानांतील पाऊस हिशेबांत घेतला, तर मे १९४३ मध्यें तो नेहमीच्या मानानें ५% कमी पडला, जूनमध्यें ११% जास्त पडला, ऑगस्टमध्यें १८% कमी पडला व सप्टेंबरमध्यें १६% अधिक झाला. ओरिसा, छोटा नागपूर व राजपुताना येथें पाऊस जास्त पडला; वायव्येकडील इतर ठिकाणीं, मलबार वगळून बाकीच्या मद्रास प्रांतांत आणि बिहार व वऱ्हाड येथें पावसाचें प्रमाण कमी होतें. इतर ठिकाणीं, पाऊस नेहमींच्या प्रमाणांतच साधारणतः पडला.

### शेतकी पतपेढ्यांचे सेक्रेटरींना शिक्षण देणारा वर्ग

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटतर्फे पूर्वखानदेश जिल्हा सहकारी देखरेख बोर्डाच्या शिक्षणकमिटीनें "शेतकी पतपेढ्यांचे सेक्रेटरींना शिक्षण देणारा वर्ग" जळगांव येथें ता. १५-५-४४ ते ता. ३-६-४४ पावेतों पूर्वखानदेश सेन्ट्रल को. बँकेच्या हॉलमध्यें भरविला होता. सदर वर्गांत १९ उमेदवारांनीं शिक्षण घेतलें. ज्या त्या विषयांत तज्ज्ञ अशा पगारी व बिनपगारी सहकारी अंमलदारांनीं वर्गांतील उमेदवारांना शिक्षण दिलें. डेप्युटी रजिस्ट्रारसाहेब पुणें यांनीं ता. ३१-५-४४ रोजीं वर्गास भेट दिली. उमेदवारांची ता. २-६-४४ व ता. ३-६-४४ ला परीक्षा घेण्यांत आली. शिक्षण वर्गाचा समारोप ता. ३-६-४४ रोजीं सायंकाळीं असि. रजिस्ट्रारसाहेब जळगांव व चेअरमन पूर्व खानदेश डिस्ट्रिक्ट बोर्ड ऑफ सुपरवायझिंग युनिअन्स लि. जळगांव यांचे हस्तें करण्यांत आला. त्यांनीं आपल्या समारोपाद्दाखल केलेल्या भाषणांत उद्बोधक उपदेश केला. एकंदरींत रूरल सेक्रेटरींना शिक्षण देण्याचा तीन-आठवड्याचा कार्यक्रम यशस्वी रितीनें पार पडला.

## बेळगांव व धारवाड जिल्ह्यांत रेशमाचा धंदा

### मुंबई सरकारचें आश्वासन व सवलती

म्हैसूर संस्थानांत रेशमाच्या किड्यांपासून रेशीम तयार करण्याचा धंदा चांगल्या रीतीनें स्थापन झालेला आहे. तेथें सुमारें ७० हजार एकर जमिनींत तुतीचीं झाडें लावण्यांत आलेलीं असून त्यांची लागवड मर्यादित करण्याची पाळी तेथें आली आहे. रेशमी किड्यांचें उत्पादन करणें, त्यांच्या कोशिट्यांपासून निघणारें रेशीम चातीवर चढविणें व रेशमाच्या धाग्यापासून कापड तयार करणें, असे ह्या धंद्याचे विभाग आहेत. कच्चें रेशीम हातांनीं काढण्यापेक्षा त्यासाठीं यंत्रसामुग्रीचा उपयोग करणें किफायतशीर असणें स्वाभाविक आहे. कोशिट्यांचें रेशीम चातीवर चढविण्याचा धंदा करण्यासाठीं श्री. नारायणराव नाईक ह्यांनीं म्हैसूर संस्थानांत तेथील सरकारच्या सहाय्यानें "म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि" ही कंपनी उभारली, ती यशस्वी झाली आहे. श्री. नाईक ह्यांच्याच मॅनेजिंग एजन्सीखालीं "श्रीराम सिल्क मिल्स लि." ही कंपनीहि बंगलोर येथें किफायतशीर रीतीनें चालू आहे.

मुंबई प्रांतांत रेशमी किडे पाळण्याचा उपक्रम दुय्यम धंदा म्हणून सुरू करण्याची शक्यता कितपत आहे, हें अजमावण्याकरितां मुंबई सरकारनें बेळगांव येथें एक प्रायोगिक केंद्र १९४० सालीं स्थापन केलें. त्याचा अनुभव उत्तेजनकारक आला. श्रीराम सिल्क मिल्स लि. चे मॅनेजिंग एजंट्स, मेसर्स एन. जी. नाईक आणि कं. लि. ह्यांनीं मुंबई सरकारास एक योजना सादर केली, तिचे प्रमाणें शेतीविषयक भाग सरकारच्या औद्योगिक खात्यानें संभाळण्याचा असून व्यापारी भागाची जबाबदारी श्रीराम सिल्क मिल्स लि.वर आहे. श्रीराम सिल्क मिल्स लि.तर्फे एक नवी लिमिटेड कंपनी स्थापन करण्यांत येईल, तिच्या स्थापनेस व वाढीस मुंबई सरकार मदत करणार आहे. डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीजची नव्या कंपनीच्या बोर्डावर डायरेक्टर म्हणून नेमणूक केली जाईल. ठराविक दरानें कोशिट्या विकत घेण्याचें कंपनीवर बंधन आहे. तुतीचीं झाडें लावून रेशमाचे किडे बाळगणाऱ्या प्रत्येक शेतकरी कुटुंबास १५० रुपये व्याज माफ तगावी कर्ज देण्याचें सरकारनें ठरविलें आहे. दोन वर्षांत किमान तीन एकर तुतीच्या लागवडीसाठीं आणल्यास एक तृतीयांश कर्ज माफ होईल. १ हजार कुटुंबांस अशा रीतीनें तगावी कर्ज देण्यांत येईल. सारामाफीचेंहि आकर्षण शेतकऱ्यांसाठीं योजलेलें आहे.

मुंबई प्रांतांतील नव्या सिल्क फिलेचर्स कंपनीला सरकारनें सढळ हातानें सवलती दिलेल्या आहेत. कंपनीचे उत्पादक तज्ज्ञ व ह्या धंद्यांतील यशस्वी कारखानदार आहेत. तेव्हां नव्या कंपनीच्या यशाबद्दल शंका बाळगण्याचें कारण नाहीं.

### श्री. आपटे ह्यांस आर्टिकल्ड क्लार्क्स घेण्यास परवानगी

हिंदुस्थान सरकारनें श्री. गो. द. आपटे बी. ए., जी. डी. ए. ह्यांचें, आर्टिकल्ड क्लार्क्सना प्रात्यक्षिक शिक्षण देण्याची परवानगी असलेल्या रजिस्टर्ड अकौंटंटसच्या सरकारी यादींत १५ मे, १९४४ रोजीं नांव दाखल केलें आहे, असें समजतें. अशा तऱ्हेची मान्यता मिळालेले ऑडिटर मुंबईबाहेर महाराष्ट्रांत एकदोनच आहेत.

# स्फुट विचार

## कालव्याखालील जमिनींत धान्यांचीं पिकें

मुंबई प्रांताच्या धान्याचें उत्पादन वाढवण्याचा सरकार शिकस्तीचा प्रयत्न करीत आहे. जमिनीचें जेवढें मोठें क्षेत्र धान्यांच्या पिकांखाली आणतां येईल तेवढें आणावयाचें आणि ह्या पिकांची पैदास शक्य तितकी वाढवावयाची ह्या त्या प्रयत्नाच्या दोन दिशा आहेत. विशिष्ट जिल्ह्यांत कपास व तंबाखू ह्यांची लागवड मर्यादित क्षेत्रांत केली जाऊन ठराविक जमिनीच्या भागांत धान्यांचीं पिकें लावलींच पाहिजेत अशी सक्ती करणारा कायदा मुंबई सरकारनें अमलांत आणला आहे हें वाचकांस माहीत आहेच. धान्यांच्या पिकांचें क्षेत्र विस्तृत करण्यासंबंधांत झालेल्या प्रचाराचा थोडा बहुत उपयोग झाला असला तरी त्याचा परिणाम अपेक्षित प्रमाणांत घडून आला नाहीं असा अनुभव आल्यानें वरील प्रकारचा सक्तीचा कायदा करणें सरकारास प्राप्त झालें. हें धोरण आणखी पुढें ढकलण्याचें त्यानें आतां ठरवलें आहे. कालवे आणि तलाव ह्यांच्या पाण्यानें भिजणाऱ्या जमिनींत त्यांच्या मालकांनीं धान्यांचीं पिकें केलींच पाहिजेत, अशी सक्ती त्यांचेवर आतां व्हावयाची आहे. वेळेवर भरपूर पाणी जमिनींत मिळालें असतां तिच्यामध्यें दुप्पट पीक येतें. पण खरीपाच्या हंगामांत अनेक शेतकरी पावसावर विसंबून रहातात आणि त्यामुळें उत्पादन व्हावें तितकें होत नाहीं. सरकारनें कालव्यांवर कोट्यावधि रुपये खर्चले आहेत आणि ह्या खर्चाचा उपयोग धान्य निर्मितीच्या वाढीस व्हावा अशी त्याची इच्छा आहे. निरनिराळ्या कालव्याखालील जमिनींचे गट करण्यांत येतील आणि त्यांमधील शेतकऱ्यांस पिकांस केव्हां पाणी द्यावें हें ठरवण्यांत येईल. त्याप्रमाणें जमिनीच्या मालकांनीं आणि त्यांच्या शेत कसणाऱ्या कुळांनीं पाणी घेतलें पाहिजे. मामुली परिस्थितींत अशा सक्तीविरुद्ध टीका समर्थनीय असली तरी युद्धकालच्या सामाजिक अन्नाच्या निकडीच्या गरजा लक्षांत घेतां प्रस्तुत सक्तीचें सरकारी धोरण क्रमप्राप्त झालें आहे हें विसरून चालावयाचें नाहीं. सदरहु सक्तीची अंमलबजावणी नीट केली जात आहे कीं नाहीं हें बारकाईनें पहाण्याची दक्षता मात्र सरकारनें बाळगली पाहिजे.

---

## कपास व तंबाखू ह्यांचेऐवजी धान्यांचीं पिकें

कपास व तंबाखू ह्यांच्यासारख्या धान्येतर पिकांच्या लागवडीचें क्षेत्र मर्यादित करणारा कायदा ह्या प्रांतांत अमलांत आला आहे. निषिद्ध पिकांच्या जागीं धान्यांचीं पिकें शेतकऱ्यांनीं ह्या कायद्याअन्वयें करावयाचीं आहेत. निरनिराळ्या जिल्ह्यांतल्या जमिनी, पाऊसपाण्याची स्थिति व लागवडीचे प्रघात ह्यांमध्यें फरक असून नेहमींपेक्षा निराळीं पिकें काढण्याचे कामीं शेतकऱ्यांस मार्गदर्शनाची आवश्यकता भासणें स्वाभाविक आहे. कोणत्या जिल्ह्यांत कपास-तंबाखूच्या ऐवजीं कोणतीं पिकें करणें श्रेयस्कर आहे, ह्याची माहिती शेतीखात्यानें जमीनदारांस दिली असता तें सोयीचें होईल अशी सूचना प्रांतिक अवसल्लागार समितीनें सरकारास केली होती. तिला अनुसरून प्रस्तुत बाबतींतली तपशीलवार माहिती प्रसिद्ध करण्यांत आली आहे. तपशीलवार सल्ला कपास व तंबाखू पिकवणाऱ्या इतर जिल्ह्यांचे संबंधांत देण्यांत आला आहे. कायद्याप्रमाणें विशक्षित क्षेत्रात धान्य पिकवलेंच पाहिजे असें असल्यानें कोणत्या जमिनींत कोणतें खरीपाचें व रबीचें पिक करणें श्रेयस्कर होईल ह्याचें ज्ञान शेतकऱ्यांस आवश्यक आहे आणि सरकारमार्फत प्रसिद्ध झालेल्या ह्या बाबतींतल्या सूचना त्यांस उपयुक्त होतील ह्यांत शंका नाहीं.

---

## दुष्काळाच्या कारणांची चौकशी

गेल्या सालीं बंगालमध्यें दुष्काळाची मोठी आपत्ती तेथील लोकांवर कोसळली आणि तिच्या बरोबर व मागाहून साथींनीं त्यांस सतावलें. ह्या घटनेची. जबाबदारी कोणावर येते आणि तिला निष्काळजीपणा व अव्यवस्था हीं किती कारणभूत झालीं ह्याविषयीं कित्येक महिने चर्चा चालू होती. बंगालच्या मंत्रिमंडळाच्या ह्या बाबतींतल्या गोंधळावर कडक टीका करण्यांत आली होती आणि तींमध्यें हिंदुस्थान सरकारासहि ओढण्यांत येत होतें. अशा स्थितींत सदरहु प्रश्नाची निःपक्षपातीपणाची कसून चौकशी केली जावी अशी मागणी करण्यांत आली, आणि मध्यवर्ती असेंब्लीनें तिला जोराचा पाठिंबा दिला. ह्या लोकमतास अनुसरून हिंदुस्थान सरकारनें एक चौकशीचें कमिशन नेमलें असल्याचें ठरवलें आहे. बंगालमध्यें अन्नतुटवडा व साथी ह्यांचे योगानें मनुष्यहानी झाली तिचीं कारणें शोधून काढून असला प्रसंग उद्भवूं नये ह्यासाठी उपाययोजना सुचवावी अशा आशयाचा आदेश कमिशनला देण्यांत आला आहे. दुष्काळाच्या परिस्थितींत खाद्यपदार्थांचा पुरवठा आणि वांटणी ह्यांचे संबंधांत उपाय योजण्यांत येतात, त्यांची पद्धती सदोष आहे कीं काय आणि ती तशी असल्यास दिसून येणारे तिच्यामधील दोष कसे दूर करतां येतील ह्याबाबतींत कमिशननें सूचना करावयाच्या आहेत. दुष्काळाबरोबर येणाऱ्या सांथी व रोग ह्यांच्या निवारणार्थ औषधपाण्याची व वैद्यकीय सहायाची काय तरतूद करावी हाहि सदरहु कमिशननें करावयाच्या शिफारशींचा विषय आहे. सरकारनें कमिशनच्या चौकशीचें क्षेत्र ह्याहिपेक्षां अधिक विस्तृत केलें आहे त्याकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. दुष्काळांत अन्नपुरवठा व रोगनिवारण ह्यांची व्यवस्था कशी असावी ह्याच मुख्य बाबी चौकशीसाठी कमिशनकडे सोपवल्या असत्या तर काम भागलें असतें असें सामान्यतः वाटण्यासारखें आहे. पण जे दोन विषय एखाद्या स्वतंत्र कमिशनकडे सोपवण्याजोगे होते तेहि प्रस्तुत चौकशीच्या क्षेत्रांत दाखल करण्यांत आले आहेत. ते म्हणजे जनतेच्या मामुली अन्नांत सुधारणा करण्याची आणि धान्याच्या उत्पादनांत वाढ व त्यांच्या सकसपणांत वृद्धि होण्याची शक्यता ह्या त्या बाबी होत. हे विषय अत्यंत जिव्हाळ्याचे आहेत ह्यांत शंका नाहीं, पण त्यांची भूमिका दुष्काळी परिस्थितीवरील उपायांपेक्षा सर्वस्वी भिन्न आहे. ह्या रीतीनें दुष्काळ चौकशीच्या क्षेत्राच्या विस्तार करण्यांत आला असतां त्यास अनुसरून कमिशनची घटना आणि त्याच्या कार्याची पद्धति ह्यांची व्यवस्था होणें अगत्याचें आहे हें उघड आहे.

---

## जर्मनीचा कोंडमारा

मित्रराष्ट्रांचा जर्मनींत तीन चार दिशांनीं घेरण्याचा बेत यशस्वितेच्या मार्गास आतां लागला आहे असें युरोपियन रणक्षेत्रांवरील हालचालींवरून म्हणावयास हरकत नाहीं. कान्स

देशांत नॉर्मंडीमध्यें ब्रिटिश व अमेरिकन फौजा उतरून त्यांनी शेरबुर्ग द्वीपकल्प बहुतेक व्यापलें आहे. ह्याच सुमारास रशियानें पूर्व आघाडीवर, फिनलंडमध्यें उत्तरेकडे विजयी टढाया चालू असतांनाच जर्मनीवर नवे हल्ले चढवण्यास प्रारंभ केला आहे. इटलींत मित्रराष्ट्रांची प्रगति चांगली चालली आहेच. ह्या रितीनें तीन आघाड्यांवर जर्मनीस एकाच वेळीं लढावें लागत आहे आणि त्याचें सामर्थ्य विभागून गेलें आहे. प्रत्येक आघाडीवर आणि विशेषतः शेरबुर्ग द्वीपकल्पांत शत्रु त्यावर आलेल्या संकटास तोंड देण्याची शिकस्त करीत आहे पण त्यास समुद्रापर्यंत सारखें हटावेंच लागलें आहे. ब्रिटिश व अमेरिकन विमानांच्या जर्मनी व शत्रुव्याप्त प्रदेश ह्यांवर होणाऱ्या हल्ल्यांत खंड पडलेला नाहीं. ह्या परिस्थितींतच स्वदेशाभिमानी फ्रेंचांची मित्रराष्ट्रांस चांगली मदत होत आहे. अशा रीतीनें शत्रू चोहोंकडून घेरला गेला असतां त्यानें इंग्लंडवर हवेंतून उडणारे बॉंब पाठवण्याचा क्रम आरंभला आहे. हें शत्रूचें नवें हत्यार विध्वंसक आहे ह्यांत संशय नाहीं पण त्याचे योगानें फ्रान्समध्यें चाललेल्या ब्रिटिश व अमेरिकन चढाईंत व्यत्यय येईल अशी जर्मन सेनापतीची कल्पना असल्यास तिचा फोलपणा लवकरच प्रत्ययास येईल. ब्रिटिश जनतेनें भयंकर जर्मन बॉंबहल्ल्यांस मागें तोंड दिलें आहे आणि सारथीविहीन विमानांचाहि समाचार घेतला जाईल. फ्रान्समधील अमेरिकन व ब्रिटिश चढाईचा वेग कांहीं कमी झालें तरी शत्रूस मागें लोटतां येणार नाहीं हें निश्चित आहे. तीन-चार रणांगणांवर जर्मन फौजांची पीछेहाट चालली आहे ती प्रत्यक्ष दिसत असल्यानें जर्मन जनतेचा धीर सुटत आहे तो असल्या युक्त्यांनीं कसा सांवरला जाणार!

---

## मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळ

अहवालाचे वर्षी सोसायट्यांच्या संख्येंत १९१ ची भर पडून ती ५,६०२ झाली. नव्या सोसायट्यांपैकी थ्रिफ्ट, क्रेडिट व मल्टिपर्पज सोसायट्या ८७ होत्या. नव्या २४ पर्चेस व सेल सोसायट्याहि स्थापन झाल्या. युद्धजन्य परिस्थितीमुळें कंझूमर्स सोसायट्यांचे स्थापनेस चालना मिळून ६९ कंझूमर्स सोसायट्या नोंदण्यांत आल्या.

शेतकी पतपेढ्यांची संख्या वर्षअखेर ३,८९७ भरली. त्यांच्या स्वतःच्या भांडवलांत, म्हणजे वसूल भाग भांडवल, सभासदांच्या ठेवी, रिझर्व्ह व इतर फंड ह्या सर्वांत मिळून ५½ लक्ष रुपयांची वाढ झाली. कर्जे देणाऱ्या संस्थांकडील पतपेढ्यांची बाकी १४¾ लक्ष रुपयांनीं कमी झाली व त्यांच्या खेळत्या भांडवलांत ९ लक्ष १४ हजार रुपयांची घट झाली. वसुलीची रकम त्यापूर्वीच्या वर्षीच्या वसुलीपेक्षा १८ लक्ष ४२ हजार रुपयांनीं अधिक भरली. भिन्न सोसायट्यांच्या कारभारांत बरीच प्रगति झाली आहे. ह्या सोसायट्यांच्या कार्यक्षेत्राचे भागास ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्ट लागू करण्यांत आला असल्याकारणानें तेथें कर्जमागणी वाढत्या प्रमाणावर येत आहे व सोसायट्यांच्या सभासदांची संख्या, स्वतःचें भांडवल, ह्या सर्वांचे आंकडे वाढत आहेत. एकूण ७९ मल्टिपर्पज सोसायट्यांनीं आपल्या सभासदांस ७½ लक्ष रुपयांचा माल पुरविला व त्यांच्या १३½ लक्ष रुपये किंमतीच्या मालाची विक्री केली आणि २६,४४७ रुपये कमिशन मिळवलें.

सुपरव्हिजनची नवी पद्धत अहवालाचे वर्षी अमलांत आली परंतु ह्या योजनेची आर्थिक परिस्थिति विशेष समाधानकारक नाहीं. सुपरवायझिंग युनियन्सचें उत्पन्न सोसायट्यांचें खेळतें भांडवल व त्यांचेकडील बँकांचीं कर्जे ह्यांवर अवलंबून असतें, परंतु ह्या दोन्ही बाबतींत चांगल्या वसुलीमुळें घट दिसून येते. ह्या उलट, महागाई भत्ता, प्रॉव्हिडंट फंड, इत्यादि कारणांमुळें सुपरव्हायझिंग युनियन बोर्डांचे खर्च मात्र वाढले आहेत.

प्रांतिक सहकारी लॅंड मॉर्गेज बँकेचें वसूल भांडवल ४ लक्ष ९२ हजारांचें ४ लक्ष ९९ हजार रुपये झालें. बँकेनें २९८ अर्जदारांना ३ लक्ष ९७ हजारांचीं कर्जे दिलीं, तीं बहुंशीं जुन्या कर्जफेडीसाठींच होतीं. प्राथमिक जमीन गहाणाच्या बँकांची संख्या १७ ही कायम राहिली. त्यांच्या वसूल भांडवलांत ८,९१२ रुपयांची वाढ होऊन तें ३ लक्ष ६२ हजार रुपये झालें. मुद्दलाची व व्याजाची वसुली अनुक्रमें ३ लक्ष, ८३ हजार रुपये व २ लक्ष १२ हजार रुपये अशी झाली. येणें कर्जाचा आकडा ७ हजार रुपयांनीं कमी होऊन तो ३३ लक्ष, २४ हजारांवर आला.

मुंबई प्रांतिक सहकारी बँकेकडील ठेवींत पुष्कळच वाढ झाली. येथें कर्जांत वाढ झाली तरी जुन्या कर्जांची वसुली चांगली झाली. पिकांच्या विक्रीस लागणाऱ्या कर्जांच्या व्यवस्थेसाठीं मध्यवर्ती बँकांस रिझर्व्ह बँकेकडून सवलत मिळवून देण्याचें महत्त्वाचें कार्य प्रां. स. बँकेनें केलें. जिल्हा सेंट्रल बँकांची संख्या ११ कायम होती व त्या सर्वांनीं नफा दाखविला. त्या सर्वांच्या ४ कोटि २३ लक्ष रुपयांच्या एकूण खेळत्या भांडवलापैकीं ९१ लक्ष, ११ हजार रुपये सोसायट्यांकडे कर्जाऊ होते; गेल्या वर्षाअखेर हा आंकडा ८६ लक्ष, ४२ हजार रुपये होता. अनधिकृत थकबाकीचें कर्जाशीं प्रमाण ३०·३% वरून २·५% वर आलें. बिगर शेतकी क्रेडिट सोसायट्यांची संख्या ७५३ वरून ७७१ वर गेली व त्यांचें खेळतें भांडवल ६ कोटि, ९० लक्ष रुपयांचें ८ कोटि, ३५ लक्ष रुपये झालें. २० हजारांपेक्षा जास्त भाग भांडवल असणाऱ्या अर्बन बँकांची संख्या ६४ ची ७१ झाली. एकट्या अर्बन क्रेडिट सोसायट्यांचेंच खेळतें भांडवल ४ कोटि ४४ लक्ष रुपये आहे. अर्बन बँकांचें कार्य लहान व्यापारी व कामकरी ह्यांस उपयुक्त ठरलें आहे. अहवालाचे वर्षी अर्बन बँका व सोसायट्या ह्यांनीं नियंत्रित केलेला व न केलेला माल सभासदांस पुरविण्याचें काम केलें. प्रांतिक सहकारी इन्शुअरन्स सोसायटीनें अहवालाचे वर्षी २३ लाखांचे विमे उतरले. तिचा विमाखातीं फंड १६ लक्ष, २८ हजारांवर गेला. कंझूमर्स सोसायट्यांची संख्या ३८ ची १०६ झाली व त्यांनीं ४५ लक्ष, ३५ हजार रुपये किंमतीच्या मालाची विक्री केली.

अहवालाचे वर्षी ४ हौसिंग सोसायट्या नोंदण्यांत आल्या व २ गुंडाळण्यांत येऊन हौसिंग सोसायट्यांची संख्या १०७ झाली. बांगड्या करणें, मधमाशा पाळणें, पायतणें करणें, इत्यादींच्या सोसायट्यांची प्रगति बरी झाली. विणकर सोसायट्या ह्याच उत्पादक सोसायट्यांत महत्त्वाच्या आहेत, परंतु त्यांची आर्थिक परिस्थिति अद्याप ताळ्यावर आलेली नाहीं.

एकंदरीनें पहातां, अहवालाच्या वर्षांतील सहकारी चळवळीची प्रगति समाधानकारक समजली पाहिजे. वाढलेल्या बाजारभावामुळें शेतीच्या उत्पन्नांत भर पडली त्या कारणानें व इतरहि कांहीं उपाययोजनांमुळें पतपेढ्यांची वसुली सुधारली. शेतीच्या मालाची सहकारी पद्धतीनें विक्री व्हावी ह्याचा प्रयत्न चालू आहे व लवकरच उत्पादनासाठीं भांडवल पुरवठा व विक्री ह्यांची चांगली सांगड घातली जाईल, अशीं चिन्हें दिसत आहेत.

## मुद्रण-प्रकाशन धंद्यावर आघात

( लेखक—श्री. वि. अ. पटवर्धन, पुणें ).

हिंदुस्तान सरकारनें पेपर कंट्रोल ( एकॉनॉमी ) ऑर्डर ता. १२ जून रोजीं प्रसिद्ध करून त्याची अंमलबजावणी तावडतोब सुरू होणार असल्याचें प्रसिद्ध केल्यानें मुद्रक, पुस्तकांचे प्रकाशक, नियतकालिकांचे प्रकाशक यांच्यामध्यें भयंकर खळबळ उडून गेली असून हे धंदे सफा बुडणार अशी भीति सर्वत्रांस वाटावयास लागली आहे. कागदाचा वापर काटकसरीनें व्हावा हा या हुकूमाचा उद्देश असून त्याच्या परिपूर्तिसाठीं मुद्रकांनीं सन १९४३ मध्यें जेवढें काम केलें असेल, त्याच्या शें. ३० टक्के फक्त छपाईचें काम केलें पाहिजे असा निर्बंध घालण्यांत आला असून शालेय पुस्तकांच्या प्रकाशकांनीं सन १९३९ च्या ( तेव्हां ज्यांचा धंदा नसेल, त्यांनीं सन १९४३ च्या ) निम्म्यानेंच छपाई फक्त केली पाहिजे असा दंडक घालण्यांत आला आहे. सरकारमान्य अगर विद्यापीठ मान्य अशी ज्यांची शालेय अगर कॉलेजांतील क्रमिक पुस्तकें नसतील, त्या प्रकाशकांनीं १९४३ च्या शें. ३० टक्के छपाई केली पाहिजे असें या हुकूमांत म्हटलें आहे. या कडक हुकूमाचे दुष्परिणाम काय होतील याची थोडीशी जरी कल्पना हिंदुस्थान सरकारास असती, तर असला व्यवहारशून्य आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणक्रमांत घोंड आणणारा हुकूम सरकारनें काढला नसता. या हुकूमाची कांटेकोर अंमलबजावणी जर झाली, तर शेंकडा ३०।४० टक्के विद्यार्थ्यांना पुस्तकाशिवाय आपला अभ्यास करावा लागेल; आणि असा अभ्यास होणें किती अवघड आहे हें सहजीं लक्षांत येणार आहे. शिक्षणाच्या वाढत्या प्रसारास पायबंद घालण्याचें श्रेय या हुकूमास मिळणार असून कागदाच्या काटकसरीच्या नांवाखालीं राष्ट्रीय नुकसान किती होईल याचा विचार हा हुकूम काढण्याचे वेळीं सरकारास सुचूं नये हें आश्चर्य होय. शैक्षणिक पुस्तकाव्यतिरिक्त इतर प्रकाशन गेल्या वर्षीच्या शें. ३० टक्के इतकेंच केलें पाहिजे असें बंधन आहे. या निर्बंधामुळें सर्वसामान्य जनतेच्या बौद्धिक जीवनांत फार मोठें खिंडार पडणार आहे. आणि मुद्रणालयांनीं व प्रकाशकांनीं एकूण वर्षांत जो कागद या हुकूमाखालीं वापरावयाचा असेल, त्याचा एक बारांश हिस्सा फक्त प्रतिमासीं वापरला पाहिजे, जास्त वापरून चालणार नाहीं. एकाद्या मुद्रणालयानें अगर प्रकाशकानें गतवर्षीं जर ६० टन कागद खर्च केला असेल, तर त्यांस या हुकूमानें यापुढें वर्षास १८ टन कागद वापरावयास मिळणार असून त्यानें दरमहा फक्त दीड टनच कागद छापून स्वस्थ बसलें पाहिजे. प्रकाशकांस मात्र अशी सवलत ठेवण्यांत आली आहे कीं, दोनचार महिन्यांचा अगर जास्त मुदतीचा कागद ठरलेल्या मुदतीच्या आंत कागद नियंत्रक अधिकाऱ्याची परवानगी घेऊन वापरतां येईल. पण मुद्रकांस मात्र तशी परवानगी मागण्याची सवलत ठेवलेली नाहीं. प्रकाशक व मुद्रक यांचे धंदे परस्परावलंबी असल्यानें एकाद्या प्रकाशकास परवानगी देऊन व्यवहारांत ती निरुपयोगीच ठरूं शकेल. मुद्रकाला जर ठराविक प्रमाणाच्या बाहेर छापण्याची परवानगी नसेल, तर तो प्रकाशकाचें पुस्तक तरी कसें छापून देऊं शकेल ! अशाच तऱ्हेचें बंधन स्टेशनरी मालाच्या कारखानदारांवर घालण्यांत आलेलें आहे. मुद्रण, प्रकाशन व स्टेशनरी मालाचा कारखाना हे हंगामी स्वरूपाचे आहेत. त्यांना थोडेंबहुत कांहीं महिन्यांत जास्त कामाचा उठाव करावा लागत असतो. शिक्षणसंस्थांचे नवीन वर्ष सुरू होण्याचे पूर्वी दोनतीन महिने मुद्रक, प्रकाशक, स्टेशनर्स यांना शिक्षणसंस्थांना लागणाऱ्या कामाव्यतिरिक्त इतर काम करण्यास फुरसत असूं शकत नाहीं. ही वस्तुस्थिति दृष्टीआड करून सरकारनें प्रतिमासीं एकबारांश कागद वापर करण्याची अट घालण्यांत आपल्या परिस्थितीच्या अज्ञानाचें केंविलवाणें प्रदर्शन केलें आहे. प्रकाशकांनीं ज्या कांहीं योजना केल्या असतील, अगर मुद्रकांनीं जीं कामें अंगावर घेतलीं असतील, तीं पुरी करण्यास लागणारा योग्य अवसर त्यांना सरकारनें द्यावयास पाहिजे होता. या हुकूमाचा प्रकाशनकाळ व त्याच्या अंमलबजावणीचा काळ यांमध्यें दोन तीन महिन्यांचे तरी अंतर असावयास पाहिजे होतें. मुद्रक व प्रकाशक यांच्यावर यांनीं आपल्या गिऱ्हाईकांना दिलेलीं वचनें पुरीं करण्याचें एक नैतिक बंधन असतें. पण सरकारच्या लक्ष्यांत ही साधी गोष्ट सुद्धां आली नाहीं, इतकी घिसाडघाई सरकारला झाली होती.

वृत्तपत्रीय ( न्यूज प्रिंट ) कागदाव्यतिरिक्त इतर कागदावर जीं मासिकें, नियतकालिकें छापलीं जातात, त्यांचीं पानें शें. ३० टक्के ठेवावीत असें सरकारनें या हुकूमाच्या एका कलमांत म्हटलें आहे. ज्या मासिकाचीं पानें पूर्वी ५० असतील तीं यापुढें फक्त १५ पानांत संपविलीं पाहिजेत. एवढ्याशा तुटपुंज्या जागेंत जाहिराती व मजकुराचीं पानें किती द्यावयाची हा अवघड प्रश्न नियतकालिकांच्या पुढें राहील. मासिकाची वर्गणी आणि अंकांत असणारीं वाचनीय पानें यांचें प्रमाण व्यस्त पडल्यानें सरकारी हुकूमाचा परिणाम हीं मासिकें जवळजवळ नामशेष होण्यांत होणार आहे. वाङ्मयदृष्ट्या ही फार मोठी हानि हें तर खरेंच, पण त्याशिवाय मोठें नुकसान म्हणजे सर्वसामान्य जनतेचें वाचनाचें प्रमुख साधन नष्ट होणार हें होय.

या पेपर कंट्रोल ( एकॉनॉमी ) ऑर्डरीनें कागदाची बचत होईल हें खरें; पण त्याची किंमत जनतेला किती मोठ्या प्रमाणांत द्यावी लागणार आहे ! नियतकालिकें, शालेय व इतर प्रकाशन, आणि मुद्रणालयांचा धंदा रसातळाला नेऊन कागदाची बचत सरकार करणार आहे.

---

### रस्त्यांच्या कार्यक्रमासाठी यंत्रसामुग्रीची आयात

हिंदुस्थानांत रस्ते करण्याच्या ४½ अब्ज रुपयांच्या कार्यक्रमास लागणाऱ्या यंत्रसामुग्रीचा विचार करून, वेळेवर ती हातीं यावी यासाठी विलायतेंत ऑर्डरी देण्याकरितां एक कमिटी नेमण्यांत येणार आहे.

### मद्रास प्रांतांतील रस्त्यांची योजना

रस्त्यांच्या अखिल भारतीय योजनेच्या प्रांतिक भागासंबंधीं तपशील इतर प्रांतिक सरकारांप्रमाणें मद्रास सरकारहि मध्यवर्ती सरकाराकडे लवकरच पाठवील. या योजनेनुसार मुंबई प्रांतांत १८ हजार मैल लांबीच्या रस्त्यांची भर पडेल, एकूण ३५ कोटि रुपयांच्या खर्चापैकी २५ कोटींचा विनियोग विद्यमान रस्त्यांच्या सुधारणेकडे व प्रत्येकीं ५ कोटि नव्या रस्त्यांकडे व पुलांकडे खर्ची पडतील आणि सबंद योजना १० ते १५ वर्षांत पुरी होईल असा आजचा अंदाज आहे.

## सहकारी सेल सोसायट्यांची परिषद्

पूर्व खानदेश डिस्ट्रिक्ट बोर्ड ऑफ सुपरवायसिंग युनियन्सच्या एज्युकेशन कमिटीच्या विद्यमानें पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सहकारी सेल सोसायट्यांची परिषद् तारीख २३-४-४४ रोजी वडगांव बु॥ पेटा वडगांव जिल्हा पूर्व खानदेश येथें भरविण्यांत आली. परिषदेचें कामकाज दुपारीं ३ वाजतां सुरू होऊन तें आटोपावयास संध्याकाळचे ७ वाजले होते.

परिषदेस सेल सोसायट्यांतर्फे १५ प्रतिनिधी, बहुतेक सर्व सेल सोसायट्यांचे सेक्रेटरी व प्रमुख पुढारी हजर होते.

पूर्व खानदेश जिल्ह्याचे असि. रजिस्ट्रार श्री. एस. व्ही. मीर यांनीं परिषदेस आलेले शुभ संदेश वाचून दाखविले. त्यानंतर स्वागताध्यक्ष श्री. भजर्सिंग लालसिंग पाटील यांचें भाषण झालें. श्री. नथूसिंग हरसिंग पाटील यांनीं अनुमोदन दिलें.

मे. कलेक्टरसाहेबांनीं भाषण करून या जिल्ह्यांत सहकारी चळवळीचें काम चांगलें चाललें आहे असा उल्लेख करून या चांगल्या चळवळीचा प्रसार करा व चळवळीमध्यें चांगलीं माणसें निवडून घ्या असा कळकळीचा उपदेश केला. त्यांच्या भाषणानंतर श्री. मीर यांनीं जिल्ह्यांतील सेल सोसायट्यांचें कार्य, त्यांची उपयुक्तता व महत्त्व याबद्दल माहितीपूर्ण असें प्रास्ताविक भाषण केलें.

### अध्यक्ष श्री. भास्करराव जाधव ह्यांचें भाषण

यानंतर अध्यक्ष श्री. भास्करराव जाधव यांनीं आपल्या भाषणांत बहुजन समाजाचें कल्याण करणारी अशी ही सहकारी चळवळ असल्यामुळें त्यांत सर्वांनीं भाग घ्यावा असें सुचविलें. ह्या चळवळींत भांडवलाला महत्त्व नसून व्यक्तीला महत्त्व आहे म्हणून श्रमजीवि शेतकरी व मजूर यांनाही यांत इतरांप्रमाणेंच सारखा वाव आहे. विशेषेंकरून सुरत पद्धतीच्या सेल सोसायट्या ह्या खऱ्या सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या संस्था आहेत. त्यांत सर्व शेतकऱ्यांनीं सामील होण्यांत त्यांचा फार फायदा आहे. शेतकऱ्यांच्या अडाणीपणाचा फायदा घेऊन त्यांच्या मालाची विक्री करतांना लूट करून आपलें जीवन चालविणाऱ्या वर्गाकडून सेल सोसायट्या व सहकारी चळवळ या विषयींचे गैरसमज पसरविले जातात त्यामुळें स्वतःची दिशाभूल करून घेऊन या चळवळीपासून दूर राहूं नये अशी त्यांनीं सर्व शेतकरी समाजास कळकळीची विनंती केली.

नुसत्या मागण्या करून कांहीं मिळत नसतें व तें योग्यही नसतें. लोकांनीं आपणांस मान द्यावा असें ज्यास वाटत असेल त्यांनीं त्या मानासाठी आपली लायकी सिद्ध केली पाहिजे. शेतकऱ्यांनीं स्वावलंबन, स्वाभिमान बाळगून आपली प्रगति करण्यास झटलें पाहिजे. आपण स्वतः कांहीं तरी कार्य केल्याशिवाय प्रत्यक्ष परमेश्वर देखील मदत करीत नाहीं. म्हणून प्रत्येकानें झटून प्रयत्न केले पाहिजेत व निश्चित जबाबदाऱ्या ओंगीकारून आपली सुधारणा घडवून आणण्याचे शक्य ते प्रयत्न आपणच केले पाहिजेत. असा त्यांनीं समारोप केला.

शेवटीं श्री. गुणवंतराव देशमुख श्री. मीरसाहेब आणि स्वागताध्यक्ष यांनीं समयोचित भाषणें करून अध्यक्षांचे व परिषदेस आलेल्या सर्व मंडळींचें आभार मानल्यावर परिषदेचें काम बरखास्त झालें.

### परिषदेंतील ठराव

(१) ना. पंटलु ह्यांच्या निधनाबद्दल खेदप्रदर्शन (२) रेल्वेकडून सवलती मिळण्याची विनंति (३) सरकारनें या जिल्ह्यांतील सुरत पद्धतीच्या कॉटन सेल सोसायट्यांची कपास खरेदी करावी. कपाशीचे किमान व कमाल भाव अनुक्रमें ४०० चे ५०० रु. व ५५० चे ६५० रु. करावे. (४) सुरत पद्धतीच्या कॉटन सेल सोसायट्यांच्या योजनेची मुदत ५ वर्षेपर्यंत वाढवावी. त्यांना जीन व प्रेस चालविण्याचे बाबतींत सरकारनें सढळ हातानें मदत करावी. (५) बॉंबे को. मार्केटिंग सेल सोसायटीनें सेल सोसायट्यांना लागणाऱ्या शेतीच्या व घरगुती जिनसांची खरेदी करून द्यावी; बाजारभावाचे रिपोर्टस सोसायट्यांना पाठवावे व सेल सोसायट्यांच्या कार्याचे माहितीचा प्रचार करावा. सर्व सहकारी पतपेढ्या व त्यांची युनियन ह्यांच्या मालाची विक्री व खरेदी सेल सोसायट्यामार्फतच केली जावी, ह्या धोरणाची अंमलबजावणी व्हावी. (६) ठिकठिकाणीं केंद्रें काढून कंट्रोल केलेल्या वस्तू पुरवण्यासाठी सेल सोसायट्यांचा व पतपेढ्यांचा उपयोग करून घेण्यांत यावा. (७) पू. खा. मध्यवर्ती बँकेनें व्याजाचा दर कमी करून सढळ पैसे द्यावेत (८) नियंत्रित मार्केटस जिल्ह्याच्या महत्त्वाच्या ठिकाणीं उघडण्यांत यावींत (९) इं. सें. कॉ. कमिटीवर सुरत पद्धतीच्या कॉटन सेल सोसायट्यांचे निदान दोन प्रतिनिधी असावेत, (१०) शेंगांची पैदास वाढविण्यासाठी सरकारनें ग्राउंडनट सबसिडी फंडांतून सढळ मदत करावी. (११) सेल सोसायट्यांचे गोडाउन्स, जिनिंग, प्रेसिंग व ऑइल मिल्स यासाठी सरकारी जागा मोकळी असल्यास मोफत मिळावी व तिला इतरहि सवलती मिळाव्या. (१२) सरकारी योजनेंतील रेडिओ सेट्स आपल्या जिल्ह्यांतील सेल सोसायट्यांचे केंद्रांस द्यावेत. (१३) कॉटन सेल सोसायट्यांचे बाबतीमधील तारांचा ½ खर्च परत रिफंड मिळावा.

★ नगर बॉंबे ट्रेडिंग कंपनी ★

चिनाब, लाइमज्यूस कॉर्डीअल, ऑरिंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस, मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेल्स, टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे

ट्रेड्रिस्ट,

शाखाः— माणिक चौक, अहमदनगर

हेड ऑफिसः— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.